**<u>ठळक बातम्या</u>**

- विकासदर वाढवण्यासाठी देशातल्या संपूर्ण औद्योगिक परिसंस्थेत सुधारणा करण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आवाहन
- सर्बियाचे प्रधानमंत्री मिलोस वुसेविक यांची राजीनामा देण्याची घोषणा
- देहरादूनमध्ये ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन
- १९ वर्षाखालच्या महिला टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत भारताचा स्कॉटलंडवर दीडशे धावांनी विजय

**आणि**

- शेअर बाजारातली घसरण थांबली, सेन्सेक्समधे ५३५ अंकांची वाढ

**<><><><><>**

केवळ कच्च्या मालाची निर्यात करून विकासाचा वेग वाढणं शक्य नसून विकासदर वाढवण्यासाठी संपूर्ण औद्योगिक परिसंस्थेत सुधारणा करण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. भुवनेश्वर इथे **उत्कर्ष ओदिशा-** मेक इन ओदिशा कॉनक्लेव्हच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. संशोधन आणि नवोन्मेषासाठी एक सशक्त परिसंस्था निर्माण करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेचा मोदी यांनी पुनरुच्चार केला आणि उद्योगांना या प्रयत्नात सरकारसोबत सहकार्य करण्याचं आवाहनही केलं.

उत्कर्ष ओदिशा ही ओदिशा सरकारतर्फे आयोजित केलेली एक प्रमुख जागतिक गुंतवणूक शिखर परिषद असून त्याचा उद्देश ओदिशाला भारतातलं एक आघाडीचं गुंतवणूक केंद्र आणि औद्योगिक केंद्र बनवणं असा आहे. दोन दिवसांच्या या परिषदेद्वारे पाच लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक व्हावी, असं ओदिशा सरकारचं उद्दिष्ट असून यामुळे साडे तीन लाख रोजगारांची निर्मिती होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

सर्बियाचे प्रधानमंत्री मिलोस वुसेविक यांनी आज राजीनामा देण्याची घोषणा केली. दोन महिन्यांपूर्वी म्हणजे गेल्या नोव्हेंबरमधे एक रेल्वेस्थानक कोसळल्याप्रकरणी सातत्यानं मोठ्या प्रमाणावर निदर्शनं सुरु आहेत. या दुर्घटनेत १५ जणांचा मृत्यू झाला होता. काल बेलग्रेड इथं विद्यार्थी आणि शेतकऱ्यांनी दिवसभर ठिय्या आंदोलन केलं होतं. या पार्श्वभूमीवर वुसेविक यांनी राजीनामा द्यायचा निर्णय घेतला आहे. एक वर्षापेक्षा कमी काळ ते प्रधानमंत्री पदावर राहिले आहेत.

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं येत्या गुरुवारी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या शुक्रवारी सुरु होणार आहे. शनिवारी १ फेब्रुवारीला, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प संसदेत सादर करतील.

**<><><><><>**

उत्तराखंडमधे, देहरादून इथल्या महाराणा प्रताप स्टेडियमवर ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचं उद्घाटन आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. सरकार खेळाडूंसाठी जास्तीत जास्त संधी निर्माण करत असून खेळ हे देशाच्या सर्वांगीण विकासाचं प्रमुख अंग आहे, असं प्रतिपादन मोदी यांनी यावेळी केलं. खेळासाठी आधुनिक पायाभूत सुविधा उभारल्या जात आहेत, असं सांगत खेळासाठी सरकार करत असलेल्या तरतुदींचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला.

ते म्हणाले…..

खेलो इंडियाच्या माध्यमातून खेळाडूंना पुढे जाण्याची संधी उपलब्ध करून दिली जात आहे, देशातल्या प्रत्येक जिल्ह्यात खासदार क्रीडा महोत्सव आयोजित केले जात आहेत, खेळाडूंना आपलं सामर्थ्य वाढण्यासाठी याचा उपयोग होतो असं प्रधानमंत्री म्हणाले.

ग्रीन गेम्स ही यंदाच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेची मध्यवर्ती संकल्पना आहे. तर उत्तराखंडचा राज्यपक्षी असलेल्या **मोनाल** वरून प्रेरणा घेत **माऊली** हे क्रीडा स्पर्धेचं शुभंकर चिन्ह निवडण्यात आलं.

उत्तराखंडमधल्या आठ जिल्ह्यात ११ शहरांत २८ जानेवारी ते १४ फेब्रुवारी या कालावधीत ही क्रीडा स्पर्धा होणार आहे. योग आणि मल्लखांब या खेळांचा पहिल्यांदा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये समावेश केला आहे. या स्पर्धेत देशातले सुमारे १० हजार खेळाडू सहभागी झाले आहेत.

स्पर्धेचं औपचारिक उद्घाटन होण्याआधी २६ जानेवारीला उधमसिंगनगरच्या गोलापूर इथं झालेल्या ट्राय-थलॉन स्पर्धेत मणिपूर आणि महाराष्ट्रानं पदकं जिंकली आहेत.

<><><><><>

१९ वर्षांखालील महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत सुपर सिक्स गटाच्या अंतिम सामन्यात भारताने स्कॉटलंडवर दीडशे धावांनी दणदणीत विजय मिळवला आहे. भारताच्या २०९ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना स्कॉटलंडचा संघ १४ षटकांत केवळ ५८ धावांवरच गडगडला. स्कॉटलंडची सुरुवात ही चाचपडत झाली. अवघ्या १३ धावांवर पिप्पा केली हिच्या रुपाने स्कॉटलंडला पहिला झटका बसला. त्यानंतर स्कॉटलंडच्या एकाही फलंदाजाला मोठी खेळी करण्यात यश आलं नाही. भारताच्या आयुषी शुक्लानं चार गडी बाद केले. तर वैष्णवी शर्मा आणि गोंगदी त्रिशा यांनी प्रत्येकी तीन गड्यांना तंबूचा रस्ता दाखवला.

त्याआधी भारताची सलामीवीर गोंगदी त्रिशाने नाबाद ११० धावा केल्या. अवघ्या ५९ चेंडूंमध्ये १३ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने तिनं ही कामगिरी केली. तर जी कमलीनी हिने अर्धशतक केलं.

दरम्यान, भारताने स्पर्धेच्या उपांत्य फेरीत याआधीच प्रवेश केला आहे. तर ब गटामध्ये दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंड यांनी अंतिम चारमधे आपलं स्थान निश्चित केलं आहे.

<><><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या टी ट्वेंटी मालिकेतला तिसरा सामना आज राजकोट मधे निरंजन शाह स्टेडियमवर सुरु आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. इंग्लंडची सुरुवात खराब झाली. दुसऱ्याच षटकात त्यांचा सलामीचा फलंदाज फिलीप सॉल्ट हार्दिक पंड्याच्या चेंडूवर झेलबाद झाला. मात्र त्यानंतर बेन डकेटची फटकेबाजी आणि कर्णधार जोस बटलरच्या फलंदाजीमुळे डाव सावरला. मात्र ते बाद झाल्यानंतर पुन्हा डाव गडगडला.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा इंग्लंडच्या १५ षटकात ६ बाद १२३ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

भारतीय शेअर बाजारांमध्ये गेल्या काही दिवसांमध्ये सुरू असलेल्या घसरणीनंतर आज मात्र सकारात्मक चित्र दिसून आलं. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज ५३५ अंकांची वाढ झाली आणि तो ७५ हजार ९०१ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १२८ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ९५७ अंकांवर बंद झाला. बँक, स्टील, फायनान्स तसंच ऑटोमोबाईल क्षेत्रांमध्ये आज तेजी दिसून आली. व्यापक बाजारपेठेत विक्री सुरू राहिल्याने घसरणीचा वेग मंदावल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे.

<><><><><>

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी सगळ्या राजकीय पक्षांकडून प्रचार जोरात सुरू आहे. केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा

यांनी आज संध्याकाळी कस्तुरबा नगर मतदारसंघात रोड शो केला तसंच कालकाजी इथं एका जाहीर सभेला संबोधित केलं.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी आज संध्याकाळी पटपरगंज विधानसभा मतदारसंघात एका रॅलीला संबोधित केलं. राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी आज मुंडका इथं तर हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांनी नरेला इथं प्रचार केला. आम आदमी पक्षाचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांनी घोंडा इथं जाहीर सभा घेतली.

<><><><><>

नवोन्मेषी संशोधन, औद्योगिक आणि सामाजिक भागीदारी, क्षमता निर्माण, धोरण निर्मिती करून CSIR अर्थात वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीत महत्वाची भूमिका निभावत असल्याचं केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह म्हणाले. लखनौ इथं CSIR च्या हिरक महोत्सवी समारंभाच्या उद्घाटनात ते आज बोलत होते.

//<><><><><>//